# एम ए (मराठी)

(जून २०१२ पासून प्रारंभ झाला आहे. जून२०१३ पासून लागू करण्याच्या शुद्धिकरणासह समग्र अभ्यासक्रम) (मार्च २०१३)

## अनुक्रमणिका


१. सत्र क्रमांक १ पृष्ठ ०२
२. सत्र क्रमांक २ पृष्ठ ०६
३. सत्र क्रमांक ३ पृष्ठ ११
४. सत्र क्रमांक ४ बहि:स्थ विद्यार्थिनींसाठी पृष्ठ १६
५. सत्र क्रमांक ४ नियमित विद्यार्थिनींसाठी पृष्ठ १९
६. वेळापत्रक सत्र ४ च्या नियमित विद्यार्थिनींसाठी पृष्ठ २१
७. प्रश्नपत्रिकेचे रूप पृष्ठ २२

# सत्र पहिले (१)

## १.१ मध्ययुगीन गद्य-पद्य १०४००१

उद्दिष्टे :

१. मराठी गद्य-पद्याचे रूप समजून घेणे.
२. मध्ययुगीन साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा समजून घेणे.
३. आशय आणि अभिव्यक्तींतील अभेद समजून घेणे.
४. मध्ययुगीन मराठी साहित्याचा अभ्यास करणे.

अभ्यासघटक :

१. मध्ययुगातील संप्रदायविशेषांचे स्वरूप :
२. मराठी पद्यलेखनातील सौंदर्य व रस ; सोयराबाईंच्या अभंगांचे वाङ्मयीन मूल्यमापन.
३. .मध्ययुगातील स्त्रीचे सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक रूप
४. मध्ययुगातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतरांचे साहित्यात प्रतिबिंब
५. पेशव्यांची बखरीचे वाङ्मयीन मूल्यमापन.

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | अ.मध्ययुगातील भक्तिसंप्रदायांचे साहित्यातील प्रतिबिंब<br>आ. मध्ययुगातील सामाजिक स्थितीचे कवितेत पडलेले प्रतिबिंब<br>इ. .मध्ययुगातील स्त्रीचे सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक रूप | १५ | २५ |
| २ | **सोयराबाईंचे अभंग** (६२ अभंग) | १५ | २५ |
| ३ | ए. मध्ययुगातील राजकीय स्थित्यंतरे, स्वराज्याची स्थापना व विस्तार<br>ऐ. .मध्ययुगातील गद्यलेखनाच्या प्रेरणा व स्वरूप | १५ | २५ |
| ४ | **पेशव्यांची बखर .** | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

**संदर्भग्रंथ :** १. श्रीसंतचोखामेळा :चरित्र व अभंग ; सं : स.भा. कदम
२. महाद्वाराच्या पायरीशी : ल.रा. नसीराबादकर
३. पेशव्यांची बखर : संपादक : भीमराव कुलकर्णी
४. प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास : ह.श्री. शेणोलीकर

## १.२ साहित्यविचार -१ १०४००२

उद्दिष्टे :

१. भरतप्रणित ('भारतीय') साहित्यशास्त्राचा उच्च पातळीवरील अभ्यास करणे
२. वरील अभ्यासात समाविष्ट सौंदर्य व रस यांजबःलची सखोल चिकित्सा करणे
३. साहित्यकृतीला 'भारतीय'साहित्यशास्त्राचे उपयोजन करून दाखवण्याची ऐपत कमावणे

अभ्यासघटक :

१ध्वनिसिद्धान्त
२रीतिविचार
३रसचर्चा
४काव्यानंदमीमांसा

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | ध्वनिसिद्धान्त | १५ | २५ |
| २ | रीतिविचार | १५ | २५ |
| ३ | रसचर्चा | १५ | २५ |
| ४ | काव्यानंदमीमांसा | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ

१. भारतीय साहित्यशास्त्र : ग.त्र्यं. देशपांडे
२. प्राचीन काव्यशास्त्र:र.प्र.कंगले

## १.३ मराठी वाङ्मयाचा इतिहास १०४००३
## (१८७४ - १९२०)

उद्दिष्टे:

१. मराठी भाषा-साहित्य-संस्कृती यांजबद्दल पूर्वकल्पना स्पष्ट करून घेणे
२. इतिहासाची संकल्पना स्पष्ट करून घेणे
३. कारणीभूत घटना समजून घेणे
४. वाङ्मयनिर्मिती व निर्माते यांजविषयी यथायोग्य माहिती जाणून घेणे.

अभ्यासघटक:

१. निबंध
२. कविता
३. नाटक
४. कथा-कादंबरी

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | निबंध : (प्रेरणा, निबंधकार, प्रकार इ०) | १५ | २५ |
| २ | कविता | १५ | २५ |
| ३ | नाटक | १५ | २५ |
| ४ | कथा-कादंबरी व इतर | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

**टीप : अंतर्गत परीक्षेसाठी घटकांवर प्रकल्प अथवा चर्चासत्र करावे.**

संदर्भग्रंथ :

१. वाङ्मयेतिहासाची संकल्पना : द०दि०पुंडे
२. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ व २ : अ०ना०देशपांडे (व्हीनस, पुणे)
३. मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ : भाग १ : सं० गो०म०कुळकर्णी व व०दि०कुळकर्णी(मसाप,पुणे)
४. मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ भाग १ व २ : सं०- रा०श्री०जोग (मरासासं मंडळ)
५. धार आणि काठ : नरहर कुरुंदकर
**६.** मराठी कादंबरी - पहिले शतक : कुसुमावती देशपांडे

## १.४ ऐतिहासिक भाषाविज्ञान १०४००४

उद्दिष्टे : १. भाषाविज्ञान या ज्ञानशाखेचा परिचय करून घेणे
२. भाषाविज्ञानाचा इतिहास समजून घेणे
३. ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप व त्यांतील मुख्य घटक यांचा अभ्यास करणे

अभ्यासघटक :

१. ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप
२. ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा सूक्ष्म अभ्यास
३. ध्वनीचे स्थान व प्रयत्न यांवर आधारित वर्गीकरण
४. भाषिक परिवर्तन व आदान
५. भाषाकुल संकल्पना व भारतातील भाषाकुलांचा परिचय
६. मराठी भाषेची उत्पत्ती
७. मराठीचे कालिक भेद

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | ऐतिहासिक भाषाविज्ञानाचे स्वरूप<br>ध्वनीचे स्थान व प्रयत्न, यांवर आधारित वर्गीकरण | १५ | २५ |
| २ | भाषिक परिवर्तन व आदान | १५ | २५ |
| ३ | भाषाकुल संकल्पना व<br>भारतातील भाषाकुलांचा परिचय | १५ | २५ |
| ४ | मराठी भाषेची उत्पत्ती<br>मराठीचे कालिक भेद | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ :

१. भाषाविज्ञान : वर्णनात्मक व ऐतिहासिक : सं० डॉ० स०गं० मालशे व इतर.
२. मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र : प्रा० र० रा० गोसावी
३. आधुनिक भाषाविज्ञान: सं अंजली सोमण व कल्याण काळे
४. आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धान्त व उपयोजन : मिलिन्द मालशे

# १.५ पर्यायी पत्रिका (खालील ३पैकी एक)

## १.५.१ नाटक १०४१०१

उद्दिष्टे :

१. भाषा, साहित्य, संस्कृती यांच्या दृष्टीतून प्रयोज्यकलेचे रूप समजून घेणे
२. नाटक म्हणजे नेमके काय, याचा वेध घेणे
३. नाटकाची लिखित किंवा अलिखित संहिता ही साहित्यविचारांच्या दृष्टीतून तपासणे
४. नाटकाच्या रूपाचा प्रयोगाच्या अंगाने विचार करणे.

अभ्यासघटक :

१. नाटक : साहित्यप्रकार की प्रयोगप्रकार
२. नाटकाचे प्रकार
३. काही लोकप्रयोज्यकला : रूपविचार
४. एका नाटकाचा अभ्यास : " शांतता! कोर्ट चालू आहे" : विजय तेंडुलकर
५. प्रयोगप्रकाराच्या दृष्टीतून एक नाटक : "महानिर्वाण" : सतीश आळेकर

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | नाटक : वाङ्मयप्रकार , प्रयोगप्रकार : रूपभेद | १५ | २५ |
| २ | नाटकाचे प्रकार : गद्य, संगीत, एकांकिका, शोकान्तिका, सुखांतिका, विनोदी नाटक, फार्स, एकपात्री नाटक, एकपात्री प्रयोग, इत्यादी प्रकारांचा आशय व अभिव्यक्तीच्या संदर्भात रूपविचार काही लोकप्रयोज्यकला : कीर्तन, तमाशा, जागरण व गोंधळ | १५ | २५ |
| ३ | **शांतता ! कोर्ट चालू आहे : विजय तेंडुलकर** | १५ | २५ |
| ४ | **महानिर्वाण : सतीश आळेकर** | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भ : १.मराठी नाटक : माधव मनोहर
२. मराठी नाट्यसृष्टी : गो०म०कुळकर्णी
३.मराठी नाटक आणि मराठी रंगभूमी : वा० ल० कुळकर्णी
४. नाटक आणि मी : विजय तेंडुलकर
५. तेंडुलकरांची नाट्यप्रतिभा : वसंत दावतर
६. महानिर्वाण : समीक्षा व संस्मरणे :संपा० - रेखा इनामदार साने

## १.५.२ गीतकाव्य १०४१०२

उद्दिष्टे :

१. कविता, गीत व गीतकाव्य यांतील अंतर समजून घेणे
२. मराठीतील समृद्ध गीतकवितेचा परिचय करून घेणे
३. गीतकाव्याच्या सामर्थ्याचा सूक्ष्म अभ्यास करणे

अभ्यासघटक :

१. गीतकाव्याचे रूप व बलस्थाने
२. शीळ संग्रहातील गीतकविता
३. शब्दांतील संगीतधर्म व अभिनय
४. बोलगाणी संग्रहातील गद्योच्चारी गाणी

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | अ. कविता-गीत-गीतकाव्य परस्पर भेदाचे स्वरूप<br>आ. गीतकाव्याची पत : आत्मपरता<br>इ. गीतकाव्याची प्रत : नादमाधुर्य.<br>ई. चलच्चित्रमयता | १५ | २५ |
| २ | शीळ : ना०घ०देशपांडे | १५ | २५ |
| ३ | चित्रमयता,वर्णनात्म गीते.<br>शब्दातील अभिनय<br>गीतकवितेतील संगीतधर्म व नाट्यधर्म | १५ | २५ |
| ४ | बोलगाणी : मंगेश पाडगावकर | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ : १. गीतकाव्य : सं० वसंत दावतर व इतर
२. Lyric Impulse : C. Day Lewis
३. "मुक्तक आणि भावगीत" 'मधुपर्क' प्रस्तावना : पु ०मं०लाड
४. रूपनिरूपण : शिरीष गोपाळ देशपाडे
५. गीतभान : रमेश तेंडुलकर

## १.५.३ आत्मपर व ललितलेखन १०४१०३

उद्दिष्ट्ये :

१. मराठीत अर्वाचीन काळात आत्मपर लेखनाने विशेष जोर धरला. परंपरा निर्माण केली. ते का , ह्याचा अभ्यास करणे.
२. चरित्र, आत्मचरित्र , आत्मकथन, आत्मचित्र, प्रवासवर्णन, ललित निबंध , रोजनिशी यांतील साम्यभेद समजून घेणे.
३. आत्मपर लेखनाचे मूलद्रव्य 'सत्य' की 'सौंदर्य', ह्याचा विचार करणे.

अभ्यासघटक :

१. सत्य आणि आत्मपरता
२. स्मृतिचित्रे :(आत्मचरित्र)
३. वस्तुनिष्ठा, नाट्यधर्म आणि काव्यधर्म
४. माझा प्रवास(प्रवासपर आत्मथन)

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | वस्तुस्थिती, वास्तव, तथ्य आणि सत्य ; आत्मपर लिहिण्याचे प्रयोजन | १५ | २५ |
| २ | स्मृतिचित्रे (संक्षिप्त आवृत्ती : साहित्य अकादमी) : लक्ष्मीबाई टिळक | १५ | २५ |
| ३ | आत्मपर लेखनातील 'मी'ची रूपे. वस्तुनिष्ठेवर आत्मनिष्ठेचा होणारा परिणाम | १५ | २५ |
| ४ | माझा प्रवास : गोडसे भटजी | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ :१.वा०ल०कुलकर्णी गौरवग्रंथ : संपादक श्री०पु०भागवत व इतर
२. रूपनिरूपण : डॉ०शिरीष गोपाळ देशपांडे
३. प्रवासवर्णन : एक साहित्यप्रकार : वसंत सावंत
४. चरित्र आत्मचरित्र : सदा कऱ्हाडे

..........................................................................................

# सत्र दुसरे (२)

## २.१ वाङ्मयप्रकार (सैद्धान्तिक) २०४००५

उद्दिष्ट्ये :

१. साहित्यकृतीचा रूपबंध का व कसा निर्माण होतो, हे समजून घेणे.
२. रूपबंधाच्या वैविध्यातील साम्यभेद जाणून घेणे
३. रूपबंधाचे सामर्थ्य व मर्यादा यांचा बोध करून घेणे
४. रूपबंधांचे वर्गीकरण करणे

अभ्यासघटक :

१. साहित्यरूपाचा सिद्धांत व स्वरूप
२. रूपभेद
३. विशेष प्रकार
४. ललित व ललितेतर कथनरूपातील भेदाभेद

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | सिद्धांतस्वरूप : साहित्यप्रकारनिश्चितीची सैद्धान्तिक भूमिका.<br>वाङ्मयप्रकार, लेखनप्रकार व प्रयोगप्रकार | १५ | २५ |
| २ | रूपभेद : साहित्याचे मूलद्रव्य, साधन व माध्यम.<br>साहित्यकृतीच्या वर्गीकरणाचे निकष (उदा० ग्रामीणकथा, प्रेमकविता)<br>कविता, नाटक, कथा,कादंबरी यांतील मूलभूत भेद. | १५ | २५ |
| ३ | विशेष प्रकार : कविता, गीत व गीतकाव्य ;<br>शोकान्तिका,सुखान्तिका, संगीत नाटक<br>संस्कृतिभेदानुसार स्तुतिगीताची रूपे<br>आदिम- स्तोत्र,<br>लोक- भारूड,<br>जनप्रिय-पोवाडा,<br>नागर- आरती,<br>भक्ती- अभंग | १५ | २५ |
| ४ | कथात्म साहित्यातील घटनाक्रम : कथा, लघुकथा व नवकथा.<br>दीर्घकथा व लघुकादंबरी : साम्यभेद<br>सत्याधिष्ठित गद्याचे रूप : वस्तुस्थिती, वास्तव, तथ्य व सत्य | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ :

१. रूपनिरूपण : डॉ०शिरीष गोपाळ देशपांडे.
२. वा०ल०कुलकर्णी गौरवग्रंथ : संपादक श्री०पु०भागवत व इतर

## साहित्यविचार - २ २०४००६

उद्दिष्टे:

१. पाश्चिमात्य साहित्यविचारांचा परिचय करून घेणे
२. साहित्यविचारांतील महत्त्वाच्या संकल्पना समजून घेणे
३. साहित्यविचारांनुसार साहित्याचे स्वरूप, प्रयोजन, निर्मिती आणि माध्यम यांचे आकलन करून घेणे

अभ्यासघटक:

१. साहित्याचे स्वरूप
२. साहित्याचे प्रयोजन
३. साहित्याची निर्मिती
४. साहित्याचे माध्यम

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | साहित्याचे स्वरूप :अनुकृतिसिद्धान्त -प्लेटो, ॲरिस्टॉटल<br>रूपबंध - सेद्रिय एकात्मता, संघटना हेतुपूर्णता ; | १५ | २५ |
| २ | साहित्याचे प्रयोजन : लौकिकतावादी विचारसरणी, ज्ञान व नीती, - कॅथार्सिस, अलौकिकतावादी विचारसरणी, स्वायत्ततावादी भूमिका, निरपेक्ष आनंद (पाश्चिमात्य व भारतीय ) | १५ | २५ |
| ३ | साहित्याची निर्मिती : चमत्कृती, स्फूर्ती, कल्पनाशक्ती, प्रतिभाशक्ती, यांसंबंधीचा विचार ( कोलरीज, इलियट, बा०सी०मर्ढेकर, कुसुमावती देशपांडे) | १५ | २५ |
| ४ | साहित्याचे माध्यम : भाषेचे स्वरूप, अनेकार्थता, (ambiguity) विरोधाभास (paradox) अपरिचितीकरण (defamiliarization) नियमोल्लंघन इ. | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ :
१. सौंदर्यमीमांसा : रा०भा०पाटणकर :
२. सौंदर्यानुभव : प्रभाकर पाध्ये
३.लेख : साहित्याभ्यास व शैली विज्ञान (प्रकरण ७ वे) :) ‘आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत व उपयोजन : मिलिन्द मालशे
४.Arts and Man : BS Mardhekar
५.सौंदर्य आणि साहित्य : बासी मर्ढेकर
६. पासंग ( आ २ री ) : कुसुमावती देशपांडे
७. ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र : गोवि करंदीकर
८. साहित्यविचार : अरविन्द कुळकर्णी

## २.३.मराठी वाङ्मयाचा इतिहास (१९२०-७५) २०४००७

उद्दिष्टे:
१.मराठी भाषा-साहित्य-संस्कृती यांजबःल पूर्वकल्पना स्पष्ट करून घेणे
२.इतिहासाची संकल्पना स्पष्ट करून घेणे
३.कारणीभूत घटना समजून घेणे
४.वाङ्मयनिर्मिती व निर्माते यांजविषयी यथायोग्य माहिती जाणून घेणे .
५. प्रेरणा, प्रवृत्ती, प्रवाह व प्रकार इ० बाबी समजून घेणे.
अभ्यासघटक:
१कविता
२नाटक+कादंबरी
३कथा
४ वैचारिक व ललित गद्य

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | कविता | १५ | २५ |
| २ | नाटक व कादंबरी | १५ | २५ |
| ३ | कथा | १५ | २५ |
| ४ | वैचारिक व ललित गद्य | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

**टीप : अंतर्गत परीक्षेसाठी घटकांवर प्रकल्प अथवा चर्चासत्र करावे.**

संदर्भग्रंथ :
१वाङ्मयेतिहासाची संकल्पना : द०दि०पुंडे
२आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग १ व २ : अ०ना०देशपांडे (व्हीनस, पुणे)
३मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ : भाग १ : सं० गो०म०कुळकर्णी व
व०दि०कुळकर्णी(मसाप,पुणे)
४मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ भाग १ व २ : सं०- रा०श्री०जोग (मरासासं मंडळ)
५प्रदक्षिणा : ५वी आवृत्ती : (कॉण्टि, पुणे)
५. अर्वाचीन मराठी काव्यदर्शन : अक्षयकुमार काळे

## २.४. वर्णनात्मक भाषाविज्ञान २०४००८

उःिष्टे :
१. वर्णनात्मक भाषाविज्ञान या ज्ञानशाखेचा परिचय करून घेणे
२. वर्णनात्मक भाषाविज्ञानाचा इतिहास समजून घेणे
३. वर्णनात्मक भाषाविज्ञानाचे स्वरूप व त्यांतील मुख्य घटक यांचा अभ्यास करणे
अभ्यासघटक:
१.वर्णनात्मक भाषाविज्ञानाचे स्वरूप
२. स्वनिमविन्यास
३. पदिमविन्यास
४. भाषिक रचना
५. .अर्थविन्यास
६. वऱ्हाडी व अहिराणी बोलींचा वर्णनात्मक अभ्यास

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | वर्णनात्मक भाषाविज्ञानाचे स्वरूप<br>स्वनिमविन्यास | १५ | २५ |
| २ | पदिमविन्यास<br>भाषिक रचना | १५ | २५ |
| ३ | अर्थविन्यास | १५ | २५ |
| ४ | वऱ्हाडी व अहिराणी बोलींचा वर्णनात्मक अभ्यास | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ :


१. भाषाविज्ञान : वर्णनात्मक व ऐतिहासिक : सं० डॉ० स०गं० मालशे व इतर.
२. आधुनिक भाषाविज्ञान : संपादक : डॉ० अंजली सोमण व डॉ० कल्याण काळे.
३. आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धान्त व उपयोजन :डॉ० मिलिन्द मालशे
४. ध्वनिविचार : डॉ० ना०गो० कालेलकर


# स्पेशलायझेशन

## २. ५.१.पटकथालेखन -१ २०४१०४

### कथालेखन व गीत लेखन

उद्दिष्टे :

१. पटकथेच्या अनुषंगाने मूलस्वरूपी साहित्यनिर्मिती करण्यासाठी उद्युक्त करणे.
२. उपजत प्रतिभेची शाकारणी करणे
३. कथालेखनाची , गीतलेखनाची मूलतत्त्वे समजून घेणे
४. कथालेखन व गीतलेखन यांचे पटकथेतील माहात्म्य समजून घेणे.

अभ्यासघटक :

१. कथेचे मूलद्रव्य, कथेच्या ‘भूमी’,कथेचे लेखनतंत्र.
२. कथेचे प्रकार व वर्गीकरण
३. कथालेखन २

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | कथेचे मूलद्रव्य.<br>घटनाक्रमाचे माहात्म्य व व्यक्तिचित्रणाचे गौणत्व.<br>कथेच्या ‘भूमी’ :<br>कथेचे प्रकार<br>कथेचे वर्गीकरण | १५ | २५ |
| २ | पद्यरचनेचे मूलतत्त्व.<br>शब्दक्रमाची अद्वितीयता.<br>कविता, गीत आणि गीतकाव्य<br>भावगीत, नाट्यगीत व चित्रपटगीत : साम्यभेद | १५ | २५ |
| ३ | कथेचे लेखनतंत्र व कथालेखनानुभव | १५ | २५ |
| ४ | गीतलेखनाचे रचना तंत्र व गीतलेखनानुभव | १५ | २५ |
| | | ६० | १०० |


संदर्भग्रंथ : १. रूपनिरूपण : शिरीष गोपाळ देशपांडे
२गीतकाव्य : संपादक वसंत दावतर
३. प्रतिभासाधन : नासी फडके
४. कथा : एक साहित्यप्रकार : सुधा जोशी
५. अलंकारप्रदीप : गत्र्यं देशपांडे, पुमो निजसुरे

## २. ५. २. अध्यापन -१ २०४१०५

# साहित्याचे अध्यापन

उद्दिष्टे:

१. वर्गाला साहित्याकडे अभिमुख करायला शिकविणे.
२. साहित्याची गोडी लावायला शिकवणे.
३. वक्तृत्वाच्या विविधांगांचा पचिय करून देणे
४. शिकवण्याच्या विविध साधनांची परिणामकारकता अवगत करून देणे.
५. साहित्यकृतीचे तंत्र यांचा यथार्थ परिचय व वाचिक समीक्षा यांचा सराव करून घेणे.

अभ्यासघटक :

१. अध्यापनाची पूर्वतयारी
२. अध्यापनाचे कौशल्य
३. साहित्यकृतीचे तंत्र
४. वाचिक समीक्षा

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | अध्यापनाची पूर्वतयारी : शब्दोच्चार, नटधर्म, साहित्यकृतीचे प्रकट वाचन व वर्गातील सादरीकरण | १५ | २५ |
| २ | कौशल्य : दृक्श्राव्य साधनांचा वापर , मराठी गद्यातील भाषिक रचनाकौशल्य<br>मराठी पद्यातील भाषिक रचनाकौशल्य, संगणकाचा अध्यापनात वापर | १५ | २५ |
| ३ | साहित्यकृतीचे तंत्र : छंद व अलंकार ; प्रतिमा व प्रतीके<br>नाटकाचे माध्यम, तंत्र व शब्दांची अप्रधानता<br>शंकानिरसन व अध्ययनप्रक्रियेचे आकलन | १५ | २५ |
| ४ | वाचिक समीक्षा : कथावस्तू व कलावस्तू (कथात्म साहित्य),<br>कवितेतील शब्दक्रमाची अद्वितीयता (कविता),<br>नाटकातील स्वभाव-संस्कृतीचे वीणकाम (नाटक)<br>रसशोधन व सौंदर्यशोधन | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ :

१. वा०ल०कुळकर्णी गौरवग्रंथ
२. रूपनिरूपण : शिरीष गोपाळ देशपांडे
३. अलंकारप्रदीप : गत्र्यं देशपांडे, पुमो निजसुरे

## २. ५. ३. वृत्तविद्या -१ २०४१०६

# छापील माध्यम

उद्दिष्टे:

१. वर्तमानाबाबत जागरुकता निर्माण करणे व ते अवगत करून देणे
२. बातमी तयार करणे
३. वास्तव जगाचा वेध घेऊन त्यावर सकारात्म भाष्य करण्याची क्षमता कमावणे
४. सभोवतालच्या जगाचे तथ्यात्म आकलन करून घेणे

अभ्यासघटक :

१. विचार परंपरा
२. वर्तमानपत्रीय स्फुटलेखन
३. बातमी लेखन
४. घटनेतील सत्यसिथतीचा शोध घेणे

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्राची विचारपरंपरा व विचार-विकसनातील संपादकांचे कार्य | १५ | २५ |
| २ | स्फुटलेखन, टीका व टिप्पणी, वर्तमानपत्रीय स्फुटलेखन, | १५ | २५ |
| ३ | वार्ताहराकडून बातमी<br>घडलेल्या **घटनेची** बातमी : वर्तमानपत्राची<br>नैसर्गिक, राजकीय, वाङ्मयीन<br>सामाजिक सभा व सांस्कृतिक सभा | १५ | २५ |
| ४ | . शोध पत्रकारिता : वस्तुस्थिती,वास्तव, तथ्य आणि सत्य यांतील अंतर<br>सर्वेक्षण, कुतूहल, घटनेच्या बाह्यरूपावरून अंत:स्थितीचा शोध, | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

## २.५.४. संस्कृती -१ २०४१०७

## लोकसाहित्य (+ बहि:स्थ विद्यार्थिनींसाठीही)

उद्दिष्टे:

१. लोकसाहित्याचे स्वरूप व व्याप्ती समजून घेणे.
२. लोकसाहित्याचा नागर जीवन व ज्ञानशाखा यांजशी असलेला अनुबंध शोधणे
३. रूप, अध्ययन,परंपरा जाणून घेणे.
४. लोकप्रयोज्यकलांचा परिचय करून घेणे.

अभ्यासघटक :

१. लोकसाहित्याचे स्वरूप
२. लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती
३. लोकाविष्काराची रूपे व लोकप्रयोज्य कला.
४. लोकसंस्कृतीचे विशेष

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | लोकसाहित्याचे स्वरूप | १५ | २५ |
| २ | लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती | १५ | २५ |
| ३ | लोकाविष्काराची रूपे व लोकप्रयोज्य कला. | १५ | २५ |
| ४ | लोकसंस्कृतीचे विशेष | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

**टीप : अंतर्गत परीक्षेसाठी वरील अभ्यास घटकांवर आधारित प्रकल्प अथवा चर्चासत्र करावे.**

संदर्भग्रंथ :

१. लोकसाहित्याचे अंत:प्रवाह : प्रभाकर मांडे
२. लोकसाहित्याचे स्वरूप : दुर्गा भागवत
३. लोकसंस्कृतीचा अंत:प्रवाह : शरद व्यवहारे
४. लोकसंचित : तारा भवाळकर

## २.५.५.भाषांतर -१ २०४१०८

## भाषांतर मीमांसा

उद्दिष्टे:

१. भाषांतराचे माहात्म्य, स्वरूप, व्याप्ती व अडचणी समजून घेणे.
२. ललित व ललितेतर लेखनाच्या भाषांतराचे स्वरूप समजून घेणे
३. भाषांतरप्रक्रिया आत्मसात करणे

अभ्यास घटक:

१. भाषांतर प्रक्रियेचे स्वरूप, आवश्यकता व महत्त्व
२.भाषांतर, अनुवाद, रूपांतर : साम्यभेद
३.ललित साहित्याच्या भाषांतरप्रक्रियेतील अडचणी :

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | भाषांतर प्रक्रियेचे स्वरूप, आवश्यकता व महत्त्व | १५ | २५ |
| २ | भाषांतर, अनुवाद, रूपांतर : साम्यभेद | १५ | २५ |
| ३ | प्रशासकीय भाषांतर | १५ | २५ |
| ४ | शास्त्रीय, वैचारिक, धार्मिक ग्रंथांचे भाषांतर : स्वरूप व अडचणी | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

टीप : हा व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम असल्यामुळे अंतर्गत परीक्षेसाठी लेखनकृतीचे भाषांतर करून घेणे अपेक्षित आहे.

संदर्भग्रंथ :

१. भाषांतरमीमांसा : सं०- कल्याण काळे, अंजली सोमण
२. भाषांतर : सदा कऱ्हाडे
३. राजा लियर; प्रस्तावना : गो०वि०करंदीकर
४. भाषांतर शास्त्र की कला : म०वि०फाटक, रजनी ठकार

,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,,

# सत्र तिसरे (३)

## ३.१ अर्वाचीन गद्य-पद्य ३०४००९

उद्दिष्टे :

१. मराठी गद्य-पद्याचे रूप समजून घेणे.
२. अर्वाचीन साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा समजून घेणे.
३. आशय आणि अभिव्यक्तींतील अभेद समजून घेणे.
१. अर्वाचीन कविता व विविधरंगी गद्याची रूपे समजून घेणे

अभ्यासघटक :

१.साहित्यातील सत्य व सौंदर्य : मूलद्रव्याचा वेद व रूपभेद
२. अर्वाचीन साहित्य व आधुनिक दृष्टी : वाङ्मयीन महात्मता
३. माझी जन्मठेप : (आत्मकथन) वि.दा.सावरकर
४. जोगवा : (कवितासंग्रह) आरती प्रभू

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | अ. अर्वाचीन मराठी साहित्याची स्थूल रूपे : कविता, नाटक, कथनात्म ललितसाहित्य, सत्याधिष्ठित गद्य : रूपभेद<br>आ. साहित्यकृतीतील सत्य व सौंदर्य : साहित्याच्या मूलद्रव्याचा वेध. | १५ | २५ |
| २ | **माझी जन्मठेप : विनायक दामोदर सावरकर** | १५ | २५ |
| ३ | **जोगवा : आरती प्रभू** | १५ | २५ |
| ४ | अर्वाचीन साहित्य : आधुनिक दृष्टी, प्रयोजन, भाषा, रचनाविशेष व नेमलेल्या साहित्यकृतींची वाङ्मयीन महात्मता | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

**संदर्भग्रंथ :**


१. रूपनिरूपण : शिरीष गोपाळ देशपांडे
२. पहिली परंपरा : द भि कुलकर्णी
३. दुसरी परंपरा : द भि कुलकर्णी
४. वा ल कुळकर्णी गौरव ग्रंथ : सं.:श्री पु भागवत
५. साहित्यातील वाद ( अतिवास्तववाद) : राशं वाळिंबे


## ३.२ समीक्षा ३०४०१०

उद्दिष्टे:

१.साहित्यसमीक्षेचे स्वरूप व कार्य समजून घेणे
२. समीक्षाप्रक्रिया ध्यानात घेणे
३. समीक्षापद्धतींचा स्थूल परिचय करून घेणे.
४. नेमलेल्या पद्धतींची मूलतत्त्वे व निकष समजून घेणे

अभ्यासघटक:

१. साहित्यसमीक्षेचे स्वरूप व साहित्यसमीक्षेची प्रक्रिया
२. रूपवादी समीक्षा : शैलीलक्ष्यी समीक्षा
३. ऐतिहासिक, चरित्रात्मक, आस्वादक समीक्षा; समाजशास्त्रीय समीक्षा :
४. मानसशास्त्रीय समीक्षा :

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | साहित्यसमीक्षेचे स्वरूप :<br>समीक्षेची संकल्पना : विज्ञान संशोधन , इतिहास इ० यांजहून वेगळेपण<br>साहित्यसमीक्षेची प्रक्रिया : आस्वाद, आकलन, विश्लेषण, अर्थनिर्णयन व मूल्यमापन<br>समीक्षेची भाषा | १५ | २५ |
| २ | रूपवादी समीक्षा :<br>वैचारिक भूमिका, 'न्यू' क्रिटिसिझम मधील मूलतत्त्वे, रशियन रूपवादातील मूलतत्त्वे,<br>शैलीलक्ष्यी समीक्षा : वैचारिक भूमिका, शैलीचे स्वरूप व प्रकार | १५ | २५ |
| ३ | ऐतिहासिक, चरित्रात्मक, आस्वादक समीक्षा : वैचारिक भूमिका व स्थूल परिचय<br>समाजशास्त्रीय समीक्षा : वैचारिक भूमिका ( तेन व मार्क्स यांच्या विचारांसह) | १५ | २५ |
| ४ | मानसशास्त्रीय समीक्षा : वैचारिक भूमिका ,<br>फ्रॉइड (मानवी मन , कामप्रेरणा व स्वप्न यांजविषयीचे सिद्धांत)<br>युंग ( समूहमन व आदिबंध यांजविषयीच्या संकल्पना)<br>उपयुक्तता व मर्यादा. | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ :
१.नवसमीक्षा : सं० गोम कुळकर्णी
२.उपयोजित समीक्षा : व०आ० डहाकी
३.आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धान्त व उपयोजन : मिलिन्द मालशे
४.साहित्याची भाषा : भालचंद्र नेमाडे
५.साहित्य, समाज आणि संसकृती : दिगंबर पाध्ये

## ३.३ लेखकाचा अभ्यास (सैद्धांतिक) ३०४०११

२०१३ व २०१४ या २ वर्षांतील परीक्षांत, सिद्धांत निश्चितीसाठी उदाहरण म्हणून, लेखक **शाहीर अण्णा भाऊ साठे** यांचा अभ्यास करावयाचा आहे

उद्दिष्टे :

१. एखादा लेखक कोणत्या परिस्थितीत साहित्यनिर्मिती करतो याचा वेध घेणे.
२. परिस्थितिवादानुषंगाने प्रेरणांचा शोध घेणे
३. परिस्थितिनिरपेक्ष अक्षर साहित्याची निर्मिती होण्यामागील सिद्धांतनिश्चिती तपासणे
४. लेखकाची जाणीव व नेणीव यांची साहित्यनिर्मितीमधील भूमिका समजून घेणे

अभ्यासघटक :

१. लेखकाच्या जन्मापासून साहित्यनिर्मितीपर्यन्तच्या कालखंडातील समग्र परिस्थितीचे अध्ययन
२. शाहीर अण्णा भाऊ साठे यांचे निवडक पोवाडे
३. एक साहित्यकृती : कादंबरी : ‘‘माकडीचा माळ’’ ( व त्यावरील आधारित चित्रपट : ‘डोंगरची मैना’)
४. लेखकाच्या लेखनामागील प्रेरणांबाबत निष्कर्ष व लेखनाचे मूल्यमापन

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | **परिस्थिती :**<br>जन्म व बालपण<br>काळ, प्रदेश, शिक्षण, संस्कार, व्यवसाय, परिसर<br>**वातावरण:**<br>कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, राष्ट्रीय इत्यादी वातावरणाची लेखकाच्या जडणघडणीतील भूमिका | १५ | २५ |
| २ | **पोवाडे :**<br>बंगालची हाक, पंजाब दिल्लीचा दंगा, तेलंगणाचा संग्राम, महाराष्ट्राची परंपरा, अमळनेरचे अज्ञात हुतात्मे, मुंबईचा कामगार, काळ्या बाजाराचा पोवाडा | १५ | २५ |
| ३ | **‘माकडीचा माळ’** (व त्यावरील आधारित चित्रपट : ‘डोंगरची मैना’) | १५ | २५ |
| ४ | **प्रेरणा व मूल्यमापन :**<br>लेखकाच्या प्रेरणांचे आदिकारण व  निष्कर्ष ;<br>लेखकाने लेखनासाठी केलेली वाङ्मयप्रकाराची निवड;<br>प्रस्तुत लेखकाच्या लेखनकृतींचे माहात्म्य ; वाङ्मयीन सामर्थ्य;<br>प्रस्तुत लेखकाचे वाङ्मयीन योगदान | १५ | २५ |
| | **क्रेडिट क्रमांक १ व ४ यांत सदर लेखकाच्या सर्वच साहित्यकृतींचा परिचय अपेक्षित आहे.** | ६० | १०० |

संदर्भ सूची :
१. लोकसाहीर अण्णा भाऊ साठे : निवडक वाङ्मय : महाराष्ट्र सासन
२. युगांतर : प्रके अत्रे , विन्दा करंदीकर यांचे लेख
३. अण्णा भाऊ साठे : बजरंग कोरडे
४. अण्णा भाऊंचे कथाविश्व : सदा कऱ्हाडे
५. अण्णा भाऊ साठे: समाजविचार  आणि साहित्यविवेचन : बाबूराव गुरव
६. अण्णा भाऊंच्या गीतकवनांची वैशिष्ट्ये : जननायक: केशव मेश्राम

## ३.४ संशोधनशास्त्र ३०४०१२

उद्दिष्टे :

१. वाङ्मयाच्या विद्यार्थिनींना वाङ्मयीन संशोधनाचा परिचय करून देणे
२. वाङ्मयीन संशोधनाची रूपरेखा समजून देणे .
३. संशोधनाचे विविध प्रकार व प्रकृती समजून घेणे.

अभ्यासघटक :

१. संशोधनाचे स्वरूप
२. परिचय,परीक्षण,समीक्षा, संशोधन
३. संमशोधनविशेष
४. संशोधनाचा रूपबंध

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | संशोधनाचे स्वरूप व व्याख्या<br>गृहित प्रमेय : स्वरूप व मांडणी<br>शक्यता (possibility) व संभाव्यता (probability) : निवडप्रक्रिया | १५ | २५ |
| २ | साहित्यपरिचय, परीक्षण, समीक्षा व<br>संशोधन : व्याख्या व साम्यभेद<br>साहित्यकृतीचे संपादन | १५ | २५ |
| ३ | विशिष्ट लेखक<br>विशिष्ट कालखंड<br>विशिष्ट साहित्यप्रकार<br>विशिष्ट साहित्यकृती | १५ | २५ |
| ४ | शोधनिबंधलेखनाची पूर्वतयारी<br>साधनसामग्रीचे समायोजन व<br>उपकल्पनांचे विवरण<br>प्रकरणश: लेखन व निष्कर्ष<br>सूचि, तळटिपा, परिशिष्टे : प्रयोजन, आवश्यकता व कार्य | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ : भाषा साहित्य व संशोधन : वसंत जोशी
शोधनिबंधाची लेखनपद्धती : स.गं. मालशे

# स्पेशलायझेशन

## ३. ५. १ पटकथालेखन-२ ३०४१०९

### सिद्धांत व स्वरूप

उद्दिष्टे :

१.

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | सैद्धांतिक : चित्रपट- चित्रवाणी- नाटक : माध्यमभेद<br>श्रुतिका, एकांकिका व एपिसोड यांतील साम्यभेद | १५ | २५ |
| २ | कथा- कादंबरी- चित्रमालिका - चित्रपट यांत शब्दांचे स्थान ; संवादांची आवश्यकता | १५ | २५ |
| ३ | कथासूत्र- पटकथा- संवाद- गीते ; | १५ | २५ |
| ४ | जाहिरातपट व अनुबोधपट : पटकथा | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

टीप:

१. हा एक व्यावसायिक अभ्यासक्रम विद्यार्थिनींना शिकवून एका नव्या व्यवसायाची द्वारे त्यांजसाठी खुली करून दिली जात आहेत .
२. हा अभ्यास केवळ मराठीसाठी नाही. इतर विषयांचा अभ्यास करणाऱ्यांनाही प्रस्तुत पत्रिका स्वीकारता येईल.

## ३. ५.२. अध्यापन -२ ३०४११०

### व्याकरण व भाषेचे अध्यापन

उद्दिष्टे:

१. भाषा आणि व्याकरण यानतील परस्पर संबंध समजून घेणे
२. गद्य-पद्य भाषेचे स्वरूप यांतील अंतर जाणून घेणे
३. बोली व भाषा यांतील नात्यांचा अभ्यास करणे
४. मराठी भाषेचे व्याकरण अध्यापनाच्या दृष्टीने अभ्यासणे

अभ्यासघटक :

१. शब्दाचे बाह्य व अंत:स्थ रूप
२. शब्दार्थ परिवर्तन
३. भाषारूप
४. बोली व भाषा

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | वर्णमाला, शब्दाच्या जाती, काळ | १५ | २५ |
| २ | लिंग व वचने , सामान्यरूप , विभक्ती, प्रयोग, तद्धित, अभ्यस्त, संयुक्त क्रियापदे | १५ | २५ |
| ३ | गद्याची भाषा : शब्दकळा व भाषाशैली<br>व पद्याची भाषा : वृत्तविचार : अक्षरगणवृत्ते, जाती, अक्षरछंद, मुक्तछंद : | १५ | २५ |
| ४ | बोली व प्रमाणभाषा यांच्या नात्याचा अभ्यास : मराठीच्या अध्यापनात बोली व भाषेचा वापर. | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भ सूची :

१. मराठी व्याकरण : गह केळकर
२. मराठी व्याकरण : मोरा वाळिंबे

## ३. ५.३.वृत्तविद्या -२ ३०४१११

### इलेक्ट्रॉनिक माध्यम

उद्दिष्टे :

१. अर्वाचीन काळात थेट बातमीच्या स्थळावरून प्रक्षेपण उपलब्ध होते त्यांतील सामर्थ्य समजून घेणे
२. प्रत्यक्ष बातमीच्या प्रक्षेपणात सर्वसामान्य नागरिकाला स्वतंत्र निर्णय घेण्यांत कशी मदत होते, ते जाणून घेणे
३. मान्यवरांच्या चर्चेत नागरिकांना तत्क्षणी कसे सहभागी करून घेता येते , याचा सराव करणे

अभ्यासघटक :

१. इलेक्ट्रॉनिक माध्यमाचे स्वरूप
२. बातमीचे बाह्यरूप व अंतरंग
३. गडामोडीतील तथ्याचा वेध
४. अँकर-कार्य

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | क. पत्रकारिता व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे स्वरूप<br>ख. सामर्थ्ये व मर्यादा | १५ | २५ |
| २ | ग. घडलेल्या व घडणाऱ्या घटनेतील दृक्श्राव्य मूल्य ( नैसर्गिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय)<br>घ. बातमीच्या अंतरंगातील तत्त्व | १५ | २५ |
| ३ | ङ्. बातमीमधील विषयाचे आकलन<br>च. संदर्भित व्यक्तींच्या मुलाखतींतून वस्तुस्थितीचा शोध<br>छ. सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय घडामोडींतील तथ्य | १५ | २५ |
| ४ | ज. अँकर-कार्य : संभाषण, अभिनयसाधना, सहिष्णुताभान | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

## ३. ५.४. संस्कृती - २ ३०४११२

### सांस्कृतिक इतिहास (+ बहि:स्थ विद्यार्थिनींसाठीही)

उद्दिष्टे :

१. मराठी भाषा साहित्य संस्कृती यांचे शिक्षण घेताना मराठी संस्कृतीचेही अध्ययन करणे निकडीचे आहे.
२. मराठी संस्कृतीची विशेषता समजून घेणे
३. मराठी संस्कृतीचे संशोधन करण्यासाठी उद्युक्त करणे.

अभ्यासघटक :

१. महाराष्ट्रातील धार्मिक संप्रदाय
२. मराठी भाषिक काळातील राजकीय परिवर्तनांचा व घडामोडींचा मराठी संस्कृतीवरील परिणाम
३. ज्ञान आणि शिक्षण यांचा संस्कार
४. साहित्यिकांचे सांस्कृतिक कार्य

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्रातील धार्मिक संप्रदाय : नाथ, वारकरी, महानुभाव, दत्त, रामदासी इ० | १५ | २५ |
| २ | महाराष्ट्रातील राजकीय परिवर्तने व जनांची राजकीय मानसिकता: यादव, बहामनी, पारतंत्र्य, शिवाजी महाराज, पेशवे, इंग्रजी राजवट, १८५७ चे स्वातंत्र्यसमर, स्वातंत्र्यचळवळी, स्वातंत्र्यप्राप्ती, आक्रमणे, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व महाराष्ट्र राज्य निर्मिती आणीबाणी इ० | १५ | २५ |
| ३ | विज्ञानयुगाची ओळख, वर्तमानपत्रे, वैचारिक पुनरुत्थान, स्त्रीस्वातंत्र्य व शिक्षण, जातिभेदाविरुद्ध विद्रोह, | १५ | २५ |
| ४ | साहित्यिकांचे सांस्कृतिक कार्य | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

***महत्त्वाची सूचना :*** *अंतर्गत परीक्षेचा एक भाग हा 'साहित्यिकांचे सांस्कृतिक कार्य' ह्या घटकांतर्गत असेल व त्यात महाराष्ट्रातील कोणत्याही साहित्यिकाचे सांस्कृतिक कार्य, प्रत्येक विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र विषय योजून, प्रकल्पासाठी देण्यांत यावे.*
*( उदाहरणार्थ ज्ञानेश्वर, तुकडोजी, डॉ० आंबेडकर, दुर्गा भागवत इ० )*

संदर्भग्रंथ:

१. महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास : पु०ग०सहस्रबुद्धे
२. सांस्कृतिक इतिहासाची पार्श्वभूमी : सदा कऱ्हाडे
३. भारतीय संस्कृती : साने गुरुजी

## ३. ५.५ : भाषांतर -२ ३०४११३

### भाषांतरित अभिजात साहित्यकृती

उद्दिष्टे :

१. स्थलांतर, कालांतर आणि संस्कृतिभेद यांतून भाषांतरप्रक्रियेत काय बदल घडून येतो, त्याचा अभ्यास करणे
२. अभिजात साहित्यकृतींत भाषांतरामुळे कोणकोणते बदल संभवतात
३. भाषांतरामुळे सौंदर्य आणि रस यांत अंतर पडते काय त्याचा अभ्यास करणे
४. अभिजात साहित्यकृतींचा परिचय करून घेणे

अभ्यासघटक :

१. साहित्यकृतीचे भाषांतर
२. अभिजात साहित्यकृतीची 'भाषा'
३. तुघलक (नाटक)
४. सात पावलं आकाशी (कादंबरी)

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | साहित्यकृतीचे भाषांतर : नेमकेपणा व अडचणी | १५ | २५ |
| २ | अभिजात साहित्यकृतीची 'भाषा' : आशय, रस, सौंदर्य व भाषिक अडथळे | १५ | २५ |
| ३ | तुघलक (नाटक) : गिरीश कर्नाड / विजय तेंडुलकर | १५ | २५ |
| ४ | सात पावलं आकाशी (कादंबरी) : कुंदनिका कापडिया / उषा पुरोहित | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ : भाषांतरमीमांसा : कल्याण काळे; अंजली सोमण

……………………………………………………………………

# सत्र चवथे ( ४ )
# (बहि:स्थ विद्यार्थिनीं साठी)

## ४.१ समकालीन वाङ्मयीन प्रवाह ४०४३१४

स्त्रीवादी साहित्य व विज्ञानसाहित्य

उद्दिष्टे :

१ आजच्या काळात म्हणजे इस १९७५ साला पासून पुढे, मराठीत काय नवीन चालले आहे , याचा अंदाज़ घेणे

२ विद्यमान सर्व नव्या प्रवाहाबाबत अवगत होणे

३. काही प्रवाहांचा अभ्यास पदवी वर्गांत झाला आहे. इतर दोन प्रवाहांचा विशेषत्वाने अभ्यास करणे

अभ्यासघटक :

१ . विज्ञान साहित्य प्रवाह व त्यांतील विविध आकृतिबंध व साहित्यकृतींचा अभ्यास

२. एक साहित्य कृती

३. स्त्रीवादी साहित्य प्रवाह व त्यांतील विविध साहित्यकृतींचा अभ्यास

४. एक साहित्य कृती

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | वैज्ञानिक प्रगती, विज्ञान दृष्टी व विज्ञान संगती ; विश्वमन व मानवी मन यांतील नाते. | १५ | २५ |
| २ | **यंत्रमानव ( वेगवेगळ्या विज्ञानकथांचा कथासंग्रह) : संपादक - सुबोध जावडेकर** | १५ | २५ |
| ३ | स्त्रीवाद : संकल्पना, स्वरूप व प्रवाह<br>स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप व प्रकार | १५ | २५ |
| ४ | **रिटा वेलिणकर : शांता गोखले** | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भ :

१. ''युगवाणी'' (विज्ञान साहित्य विशेषांक) : मे १९८५ .

२. मराठी विज्ञान साहित्य : सं ० अ०पां० देशपांडे, व०दि०कुळकर्णी

३. प्रस्तावना-यक्षांची देणगी : जयंत नारळीकर

४. प्रस्तावना 'एप्सिलॉन' : दिलीप डबीर, शिरीष देशपांडे

५. फेमिनिस्ट क्रिटिसिझम ॲन ओव्हरव्ह्यू : शिरीन कुडचेडकर

६. स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन : अश्विनी धोंगडे

## ४.२ उपयोजित समीक्षा ४०४३१५

उद्दिष्टे :

१. तिसऱ्या सत्रापर्यन्त सौंदर्यविचार, साहित्यविचार , समीक्षा व संशोधन इत्यादी विषयांचे अध्ययन झाले आहे त्याचा उपयोग करून पाहाणे.

अभ्यास घटक :

१. रूपवादी समीक्षा उपयोजन

२. आस्वादक रूपवादी समीक्षा उपयोजन

३. समाजशास्त्रीय रूपवादी समीक्षा उपयोजन

४. मानसशास्त्रीय रूपवादी समीक्षा उपयोजन

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | रूपवादी समीक्षा : 'पेशव्यांची बखर' , 'शीळ' | १५ | २५ |
| २ | आस्वादक समीक्षा : 'जोगवा' , 'शांतता! कोर्ट चालू आहे' | १५ | २५ |
| ३ | समाजशास्त्रीय समीक्षा : 'माझा प्रवास', 'रीटा वेलीणकर' | १५ | २५ |
| ४ | मानसशास्त्रीय समीक्षा : 'महानिर्वाण' , ' स्मृतिचित्रे' | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भ : यथापूर्व (सौंदर्यविचार, साहित्यविचार , समीक्षा व संशोधन यांजविषयी असलेल्या पत्रिकांनुसार)

# ४.३.मराठी कवितेचे प्रवर्तक ४०४३१६

(ज्ञानेश्वर, तुकाराम, केशवसुत, मर्ढेकर)

उद्दिष्टे:

१. साहित्यातील प्रमुख प्रकार कविता; व मराठीत प्राचीन काळापासून परंपरा आहे ती कवितेची. तीत कशी परिवर्तने घडून आली ते समजून घेणे
२. जी परिवर्तने घडून आलीत त्यांतील सिद्धांत समजून घेणे.
३. जे प्रवाह निर्माण झाले वा प्रवाह निर्मितीचे सा,र्थ्य ज्या कवितेने दाखवून दिले तिचे माहात्म्य जोखणे.

अभ्यास घटक

१. ज्ञानेश्वर (शब्दक्रमाच्या अद्वितीयतेची कविता. )
२. तुकाराम ( विधानांच्या क्रमाच्या अद्वितीयतेची कविता. )
३. केशवसुत (आधुनिक कविता)
४. मर्ढेकर ( नवकविता)

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | **ज्ञानेश्वर**<br>**अ.** 'ज्ञानेश्वरी' : प्रारंभीचे मंगलाचरण (५ ओव्या), पसायदान (९ओव्या), श्रोतृसंवाद (९वा अध्याय-३३ ओव्या)<br>**ब.** अभंग व पदे : घनूवाजे घुणघुणा, मोगरा फुलला, आजि सोनियाचा दिनु, पैल तो गे काऊ कोकताहे, रूप पाहता लोचनी,''हरिपाठा''चा पहिला अभंग(''देवाचिये द्वारी'') | १५ | २५ |
| २ | **तुकाराम**<br>अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची (अभंगसंग्रह)(प्रत्येक विभागातील पहिले तीन अभंग ): संपादक गं०बा०सरदार | १५ | २५ |
| ३ | **केशवसुत**<br>'हरपले श्रेय'(कविता संग्रह)(प्रत्येक स्तबकातील पहिल्या तीन कविता; शिवाय 'तुतारी', 'हरपले श्रेय', 'रांगोळी घालताना पाहून', 'दुर्मुखलेला', 'आम्ही कोण', 'क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास' 'सतारीचे बोल' -केशवसुत : (संपादक: रा.श्री.जोग) | १५ | २५ |
| ४ | **मर्ढेकर**<br>'आणखी काही कविता' (कविता संग्रह) : बा०सी०मर्ढेकर | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भ टीप : (मान्यवर लेखकांनी लिहिलेले वाचावे. तसेच; वरील चार कवींबाबत मुबलक उपलब्ध आहे. जेवढे मिळेल तेवढे वाचाव : डॉ पेठे यांनी ज्ञानेश्वरांवरील संदर्भसूचीचे पुस्तकच तयार केले आहे. शिवाय लरा पांगारकर, शंदा पेंडसे, शंगो तुळपुळे, सोनोपंत दांडेकर यांनी लिहिलेले वाचावे. तुकारामांच्या संदर्भात गंबा सरदार, शंदा पेंडसे, दिपु चित्रे यांचे लेखन वाचावे. केशवसुतांच्या संदर्भात राश्री जोग, 'प्रदक्षिणा' इत्यादी; मर्ढेकरांच्या कवितेवर विजया राजाध्यक्ष यांचे वाचावे; तसेच त्यांच्या पुस्तकात सर्व संदर्भही उपलब्ध आहेत. शिवाय दभि कुळकर्णी यांची, परंपरांवरील, पुस्तके व अक्षयकुमार काळे यांचा आधुनिक कवितेवरील विवेचक ग्रंथ पाहावा. )

# ४.४कथनात्म साहित्य ४०४३१७

उद्दिष्टे :

१. गोष्ट सांगणे हे मानवी संस्कृतीच्या प्रारंभापासून चाललेले कृत्य आजच्या मराठीत कितपत समर्थतेपावेतो येऊन पोचले ते तपासणे
२. कथा व कादंबरी या दोन कथनपद्धतींतील अंतर समजून घेणे
३. कथा व कादंबरी यांतील गुणात्म फरक सिद्धांतानुरूप अभ्यासणे
४. लेबलांमागील वर्गीकरणाचा नियम समजून घेणे

अभ्यासघटक :

१. कथनमिमांसा व कथेची भूमी
२. लघुकादंबरी
३. कथा
४. दीर्घकथा

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | कथा व कादंबरी : कथन मीमांसा , घटना व घटनाक्रम , कथावस्तू व कलावस्तू, वस्तुभूमी- स्वप्नभूमी-मनोभूमी लघुकादंबरी व दीर्घकथा यांतील भेद कथा-लघुकथा-नवकथा कादंबरी-कथेचे वर्गीकरण (उदा० ग्रामीण इ०) | १५ | २५ |
| २ | **रणांगण (कादंबरी) : विश्राम बेडेकर** | १५ | २५ |
| ३ | **जरा जाऊन येतो (कथासंग्रह) : दि० बा० मोकाशी (संपा० माधुरी पणशीकर)** | १५ | २५ |
| ४ | **रमलखुणा (कथासंग्रह) : जी० ए० कुळकर्णी** | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ

१. तिसऱ्यांदा रणांगण : द०भि०कुळकर्णी
२. पार्थिवतेचे उदयास्त : द०भि०कुळकर्णी
३. जीएकुळकर्णी : धों०वि०देशपांडे
४. रूपनिरूपण : शिरीष गोपाळ देशपांडे
५. वालकुळकर्णी गौरव ग्रंथ; सं० श्रीपुभागवत व इतर

## ४.५ विनोदी साहित्य ४०४४१५

उद्दिष्ट्ये :

१. गद्य व पद्य लेखनात विनोदाचे माहात्म्य कोणते आहे, त्याचा अभ्यास करणे
२. विनोदाचे तत्त्वज्ञाक्न समजून घेणे
३. विनोदाचीप्रक्रिया व रूपे समजून घेणे

अभ्यासघटक :

१. विनोदाचे तत्त्वज्ञान, पद्धती, प्रकार
२. झेंडूची फुले : प्र के अत्रे
३. नाटक व नाट्यबाह्य लेखन प्रकार :
४. चिमणरावांचे चऱ्हाट : चिं. वि. जोशी

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | विनोदाचे तत्त्वज्ञान, विनोदाची आदिकारणे व पद्धती, प्रकार, विडंबन, उपहासिका, प्रहसनात्मकता. | १५ | २५ |
| २ | झेंडूची फुले : प्र के अत्रे | १५ | २५ |
| ३ | नाटक व नाट्यबाह्य लेखन प्रकार :<br>कॉमेडी, लो कॉमेडी, फार्स, बर्लेस्क, डार्क कॉमेडी | १५ | २५ |
| ४ | चिमणरावांचे चऱ्हाट : चिं. वि. जोशी | १५ | २५ |
| | | ६० | १०० |

संदर्भग्रंथ ;

१." दर्पण" : दिवाळी अंक विनोद विशेषांक (मुंबई पत्रकार संघ)
२.विनोदाचे तत्त्वज्ञान : प्र के अत्रे

..............................................................................................

**(टीप :** *चरित्रवाङ्मय :* ४०४४१४ **आणि** *स्त्रियांचे साहित्य व स्त्रीवादी समीक्षा* ४०४४१६ या प्रत्रिका रद्द करण्यांत आलेल्या आहेत. बहि:स्थ व दूरस्थ विद्यार्थिनींनी याची स्पष्ट नोंद घ्यावी. सत्र क्रमांक ४ साठी केवळ वरील अभ्यासक्रमच लागू आहे)

# सत्र चवथे ( ४ )
# (नियमित विद्यार्थिनीं साठी)

## ४.१ समकालीन वाङ्मयीन प्रवाह (**सेमिनार द्वारे**) ४०४०१३

स्त्रीवादी साहित्य व विज्ञानसाहित्य

उद्दिष्टे :

१. आजच्या काळात म्हणजे इस १९७५ साला पासून पुढे, मराठीत काय नवीन चालले आहे , याचा अंदाज़ घेणे
२. विद्यमान सर्व नव्या प्रवाहाबाबत अवगत होणे
३. काही प्रवाहांचा अभ्यास पदवी वर्गांत झाला आहे. इतर दोन प्रवाहांचा विशेषत्वाने अभ्यास करणे

अभ्यासघटक :

१. विज्ञान साहित्य प्रवाह व त्यांतील विविध आकृतिबंध व साहित्यकृतींचा अभ्यास
२. स्त्रीवादी साहित्य प्रवाह व त्यांतील विविध साहित्यकृतींचा अभ्यास

| क्रेडिट क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ व २ | वैज्ञानिक प्रगती, विज्ञान दृष्टी व विज्ञान संगती ; विश्वमन व मानवी मन यांतील नाते.<br>कोणतीही एक ललित विज्ञान साहित्यकृती किंवा साहित्यप्रकार | १५ +१५ | ५० |
| | | | |
| ३ व ४ | स्त्रीवाद : संकल्पना, स्वरूप व प्रवाह<br>स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप व प्रकार<br>कोणतीही एक ललित स्त्रीवादी साहित्यकृती | १५+१५ | ५० |
| | | | |
| | **सूचना :**<br>१. क्रेडिट क्रमांक १व २; -- तसेच ३ व ४ यांचे रसायन करून प्रत्येकी एक चर्चासत्रीय निबंध तयार करून चर्चासत्रात सादर करावा. प्रत्येक चर्चासत्रातील पत्रिकेच्या ५० गुणांपैकी २५ गुण अंतर्गत परीक्षकामार्फत व २५ गुण विद्यापीठाद्वारे निर्देशित परीक्षकामार्फत देण्यांत येतील.<br>२. चर्चासत्राच्या प्रत्येक पत्रिकेची गुणविभागणी ही २५ गुण पत्रिकालेखन व २५ गुण पत्रिकेचे सादरीकरण अशी करण्यांत येईल. | ६० | १०० |

संदर्भ :

१. ''युगवाणी'' (विज्ञान साहित्य विशेषांक) : मे १९८५ .
२. मराठी विज्ञान साहित्य : सं ० अ०पां० देशपांडे, व०दि०कुळकर्णी
३. प्रस्तावना-यक्षांची देणगी : जयंत नारळीकर
४. प्रस्तावना 'एप्सिलॉन' : दिलीप डबीर, शिरीष देशपांडे
५. फेमिनिस्ट क्रिटिसिझम ॲन ओव्हरव्ह्यू : शिरीन कुडचेडकर
६. स्त्रीवादी समीक्षा : स्वरूप आणि उपयोजन : अश्विनी धोंगडे

## ४.२प्रबंधिका लेखन . ४.३ / अ सेमिनार . ४.३/ आ प्रबंधिकेचे सादरीकरण ४०४८८८

उद्दिष्टे :

१. केवळ ज्ञान मिळवीत जाणे हे प्रयोजन नसून ज्ञान वृद्धिंगत करीत जाणे हे उच्च शिक्षणाचे प्रयोजन आहे.--
२. -- त्यासाठी संसोधन हा एक मार्ग आहे तो चोखाळून पाहाणे.
३. संशोधन करणे, लिहिणे व सादर करणे ;
४. संशोधन तपासून पाहाणे; तावून सुलाखून घेणे यांजसाठी चर्चासत्रात संशोधन सादर करणे.

अभ्यासघटक :

१. प्रबंधाची रूपरेषा
२. प्रबंध लेखन व प्रबंधपत्रिका
३. संशोधनाचे सादरीकरण

| क्रेडिट क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १,२,३ व ४ | (संशोधन) प्रबंधिकालेखन<br>(४० ते ७५ टंकलिखित पृष्ठांचा (म्हणजेच अकरा हजार ते एकवीस हजार शब्दांचा संशोधन प्रबंध) | ६० | १०० (५० अंतर्गत परीक्षक व ५० बाहेरील परीक्षक ) |
| १. | (संशोधन) प्रबंधिकेची रूपरेषा निश्चिती : चर्चासत्रात सादरीकरण | १५ | २५ अंतर्गत परीक्षक |
| २ | प्रबंधपत्रिका : चर्चासत्रात सादरीकरण (सदर संशोधनात अव्वल वाटणाऱ्या विषयावर १५०० शब्दांची संशोधनपत्रिका) | १५ | २५ अंतर्गत परीक्षक |
| ३+४ | प्रबंधाचे सादरीकरण म्हणजेच निष्कर्षांचे सादरीकरण म्हणजेच प्रतिपादिलेल्या सारांशाचे सादरीकरण : चर्चासत्रात सादरीकरण | ३० | ५० बाहेरील परीक्षक |
| | | १२० | २०० |

## ४.४. इंटर्नशिप : ए . मराठी संगणकीय लेखन

## ४.५.इंटर्नशिप : बी (स्पेशलायझेशन) पैकी एक

४.५.१ पटकथालेखन -३

४.५.२ अध्यापन -३

४.५.३ वृत्तविद्या -३

४.५.४ संस्कृती -३ (लोकप्रयोज्यकला)

४.५.५ भाषांतर -३

## इंटर्नशिप ४०४९९९

उद्दिष्टे :

१. केवळ पुस्तकी शिक्षण घेऊन वावरता येत नाही. सबब कार्यानुभव व प्रायोगिक जाणकारी आवश्यक असते ती कमावणे.
२. संगणकीय जमाना आला आहे त्यांत मराठी देवनागरी लेखन करता आले पाहिजे; त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेणे
३. जे लिहिले जाते ते नियमांनुसार राहावे, याचे शिक्षण घेणे.
४. स्वत:चा ज्ञानकोश करता येणे
५. आपण ज्या विषयाची विशेषता / व्यावसायिक शिक्षण कमावीत आहोत त्याचा प्रत्यक्षानुभव घेणे.
६. एम ए मराठीच्या शिक्षणा नंतर कोणताही व्यवसाय करावयाचा असल्यास त्या व्यवसायाची काही तालीम ही शिक्षणातच घडवून आणणे.

### मराठी संगणकीय लेखन (इंटर्नशिप)

अभ्यासघटक :

१. मराठी संगणकाचा सराव
२. नियमानुसार लेखन
३. संगणकीय सादरीकरण व प्रकाशकीय / संपादकीय पान तयार करणे
४. कोश-टिपण लेखन

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी फॉण्ट चा परिचय व मराठी संगणकीय लेखनाचा सराव | १५ | २५ बाहेरील परीक्षक |
| २ | मराठीचे शुद्धलेखन | १५ | २५ अंतर्गत परीक्षक |
| ३ | पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन व पेजमेकिंग | १५ | २५ बाहेरील परीक्षक |
| ४ | कोश-टिपण लेखन | १५ | २५ अंतर्गत परीक्षक |
| | | ६० | १०० |

### स्पेशलायझेशन (इंटर्नशिप) (कार्यानुभव)

### पटकथालेखन / अध्यापन / वृत्तविद्या / संस्कृती (लोकप्रयोज्य कला) / भाषांतर

| क्र० | विषय आणि विवरण | तासिकांची संख्या | नेमलेले गुण |
|---|---|---|---|
| १ | कार्यानुभवाची दैनंदिनी | १५ | २५ अंतर्गत परीक्षक |
| २ | कार्यानुभवाचा वृत्तांत व कार्यानुभवाची टिप्पणी | १५ | २५ बाहेरील परीक्षक |
| ३ | मौखिक परीक्षा | १५ | २५ बाहेरील परीक्षक |
| ४ | प्रत्यक्ष कार्यानुभवातील सहभागाचे मूल्यमापन | १५ | २५ अंतर्गत परीक्षक |
| | | ६० | १०० |

..........................................................................................

## सत्र क्रमांक चार च्या <u>नियमित</u> विद्यार्थिनींसाठी
## सर्वसाधारण वेळापत्रक

**०२ जानेवारी ते ३१ जानेवारी :**
संगणणकीय सराव,
प्रबंधाची रूपरेषा, रूपरेषेचे सादरीकरण व त्यांवरील <u>चर्चासत्र</u>,
एका प्रवाहाचे अंशत: अध्ययन व त्यावरील सेमिनारपेपरची विषयनिश्चिती.

**०१ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी :**
इंटर्नशिप - विशेष अध्ययनाचा कार्यानुभव - इष्ट ठिकाणी जाऊन

**२२ फेब्रुवारी ते १५ मार्च :**
संगणणकीय सराव,
वरील एका प्रवाहाचे अध्ययन व त्यावरील सेमिनार पेपर : सादरीकरण : <u>चर्चासत्र</u>
प्रबंधविषयाचे संशोधन

**१६ मार्च ते ०८ एप्रिल :**
प्रबंधविषयाचे संशोधन
प्रबंधपत्रिकेचे सादरीकरण <u>: चर्चासत्र</u>
दुसऱ्या प्रवाहाचे अंशत: अध्ययन व त्यावरील सेमिनारपेपरची विषयनिश्चिती.

**०९ एप्रिल ते १५ एप्रिल**
वरील दुसऱ्या प्रवाहाचे अध्ययन व त्यावरील सेमिनार पेपर : सादरीकरण : <u>चर्चासत्र</u>
प्रबंधाच्या २ प्रती सादर करणे

**१६ एप्रिल ते ३० एप्रिल :**
संगणकीय कार्यानुभवाच्या अधिक तालमी
संगणकीय कार्यानुभवाच्या परीक्षा : कोश टिपण लिहिणे , पेज मेकिंग
प्रबंधाच्या निष्कर्षांचे सादरीकरण : <u>चर्चासत्र</u>
+ पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन (प्रबंधाच्या निष्कर्षांचे सादरीकरण ; यांत इष्ट असल्यास तेथेही)

...........................................................................................

## एम ए मराठी : प्रश्नपत्रिकेचे रूप

**१.** शिरोभागी समय व गुणांचे नियम लिहावे.
**२.** खालील सूचना लिहाव्या:

**सूचना :**

१. सर्व विद्यार्थिनींनी विभाग 'अ' मधील सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. (५० गुण)
२. केवळ बहि:स्थ विद्यार्थिनींनी विभाग 'ब' सुद्धा संपूर्ण सोडवावा. (५० गुण)
३. येणे प्रमाणे नियमित विद्यार्थिनींची ५० गुणांची व बहि:स्थ विद्यार्थिनींची १०० गुणांची परीक्षा होईल.

**३.** यानंतर **'विभाग ''अ'' '** असे ठळकपणे मध्यभागी छापून त्याखाली खालील प्रमाणे प्रश्नांची मांडणी करावी. येथे सोयीसाठी तक्ता दिला आहे. प्रत्यक्षात तक्त्यात लिहू नये.

| | | |
|---|---|---|
| १. | ............................................<br>किंवा<br>............................................ | २० |
| २ | ............................................<br>किंवा<br>............................................ | २० |
| ३ | योग्य पर्याय निवडून आपल्या उत्तरपत्रिकेत लिहा :<br>(त) ............................................<br>(अ ) .............. (उ ) ..............<br>(ए).............. (ओ) ..............<br>(थ) ............................................<br>(अ ) .............. (उ ) ..............<br>(ए).............. (ओ) ..............<br>(द) ............................................<br>(अ ) .............. (उ ) ..............<br>(ए).............. (ओ) ..............<br>(ध) ............................................<br>(अ ) .............. (उ ) ..............<br>(ए).............. (ओ) ..............<br>(न) ............................................<br>(अ ) .............. (उ ) ..............<br>(ए).............. (ओ) .............. | ५X२=१० |
| | | |

**४.** यानंतर **'विभाग ''ब'' (केवळ बहि:स्थ विद्यार्थिनींसाठी)'** असे ठळकपणे मध्यभागी छापून त्याखाली खालील प्रमाणे प्रश्नांची मांडणी करावी. <u>येथे सोयीसाठी तक्ता दिला आहे. प्रत्यक्षात तक्त्यात लिहू नये.</u>

| | | |
|---|---|---|
| ४. | ............................................<br>**<u>किंवा</u>**<br>............................................ | २० |
| ५. | ............................................<br>**<u>किंवा</u>**<br>............................................ | २० |
| ६. | खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर टिपण लिहा :<br>(ष) ..................<br>(श) ..................<br>(स) .................. | १० |
| | | |

४. प्रश्नपत्रिकेत १० गुण हे वस्तुनिष्ठ चांचणीसाठी ठेवले आहेत. येथे ४ पर्याय द्यावे लागतील. चारही योग्य वाटू शकतील, असेच असावे. मात्र त्यांतील एक आणि एकच पर्याय हा योग्य (बरोबर) असला पाहिजे. एकाहून अधिक पर्याय योग्य राहूही नयेत तसेच अधिक पर्याय लिहिलेल्या उत्तरपत्रिकेत तेथे शून्यच गुण द्यावेत.

............................................